# नेतृत्व आणि समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका

**प्रस्तावना :-**

आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेसाठी उपरोक्त विषयावर निबंध लेखन सुरू करण्यापूर्वी विषयात असलेल्या दोन संकल्पनांची सर्वप्रथम आपल्याला पुरेशी माहिती करून घेणे गरजेचे आहे. यातील पहिली संकल्पना आहे नेतृत्व !

नेतृत्व म्हणजे काय ?

**ने**तृत्व हे व्यवस्थापनाच्या अनेक तत्वांपैकी एक महत्वाचे तत्व आहे. कोणत्याही कार्याच्या अंमलबजावणीत नेतृत्वाची अत्यंत गरज असते. '' एका नियोजित ध्येयपूर्तीकडे घेऊन जाण्यासाठी आणि कार्याचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी असलेले गंभीर आणि खंबीर व्यक्तिमत्व म्हणजे नेतृत्व ! नेतृत्वाच्या विविध विचारवंतांनी विविध व्याख्या केल्या आहेत. मेरी पार्कर फॉलेट म्हणतात - ' केवळ प्रभूत्व स्थापन करणे, नेतृत्वाचे वास्तविक वैशिष्ट्य नाही.''. Leader & Export या शोधनिबंधात त्या म्हणतात - ''जी आपल्या समूहात उत्साह आणि शक्ती निर्माण करू शकते, जिला पुढे येऊ इच्छिणाऱ्याला प्रोत्साहित करणे माहित असते, तसेच सदस्याच्या प्रत्यक्ष क्षमतेचा योग्य उपयोग कुठे आणि कसा करावा याचे पुरेपूर ज्ञान असते - अशी व्यक्ती योग्य नेता ठरते आणि अशा व्यक्तिकडून होणारे संघटनात्मक कार्य म्हणजे नेतृत्व होय.''

**ने**तृत्वाचे शंभर पदर आहेत. त्यापैकी नैतिकता आणि सद्सद्विवेक बुध्दीने समान प्रमाणात नैतिक मूल्ये अंमलात आणणं, हे ९९ पदर आहेत. उरलेला एक पदर कौशल्य, संघटनशक्ती, टीम बनविण्याची कला, संवादकला अशा अनेक गुणांनी बनलेला असतो. नेतृत्वाचा विचार करताना नैतिक मूल्यांकडे लक्ष न देता केवळ कौशल्याला महत्व दिले तर, हुकुमशहा, दहशतवादी आणी गॅंगस्टर निर्माण होण्याचा धोका अधिक असतो.

**सा**म, दाम, दंड, भेद अशा सर्व मार्गांनी स्वतः लोकांमध्ये प्रिय होणे आणि सत्तेत राहणे, हे कौशल्य झाले. हे नेतृत्व नव्हे. जो कुशल संघटक कधीही खोटे न बोलता कायम

सत्यवचन आणि सत्याधारित वर्तन करीत असेल, सद्सद्विवेकबुध्दी प्रमाण मानून सर्व घटकांना समान न्याय देत असेल, राजकारण आणि राष्ट्रकारण यातला फरक समजून निर्णय घेत असेल तरच त्या राजकीय कारागिराकडे, सामाजिक सुधारकाकडे नेतृत्व हा गुण निश्चितच आहे, असे मानायला हरकत नाही. आता आपण दुसऱ्या संकल्पनेकडे वळू

**समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका :-**

**अ**नेक कुटुंबे मिळून समाज तयार होत असतो, हे आपण सर्वच अगदी लहानपणापासून नागरिकशास्त्रात शिकत आलो आहोत. कुटूंब हे स्त्री-पुरूष या दोन चाकांवर सुचारू रूपाने चालत असते. अगदी त्याचप्रमाणे समाजाचा गाडा हा देखील या दोन चाकावरच व्यवस्थित चालू शकतो. मग एका चाकाचा विकास आणि दुसरे चाक अविकसित राहून कसे चालणार ? अशा वेळी दुसऱ्या चाकाला खीळ बसण्याची संभावना अधिक असते. असे होऊन समाजाला उतरती कळा लागायला नको, यासाठीच संशोधनाअंती आणि अनुभवातून असे सिध्द झाले आहे की 'सक्षम महिला तर सक्षम समाज'!

**सां**ख्य योग्य दर्शनामध्ये तर पुरूष आणि प्रकृती ही दोन सर्वव्यापी आणि नित्य तत्वे मानली गेली आहेत, जी विश्व - निर्मितीचे काम करते. याचाच अर्थ हा की दोघेही एकटे अपूर्ण आहेत. आपल्या भारतात पुरूषप्रधान संस्कृतीनुसार पुरूषांचा विकास साधण्यास फारशा अडचणी येत नाहीत. पण महिलांचा विकास म्हणजे एक प्रकारचा कठोर संघर्षच असतो. हा संघर्ष कसा, केव्हा, कशासाठी आणि कोणी कोणी केला हेच या निबंधाच्या माध्यमातून आपल्याला समजून घ्यायचे आहे. अभ्यासून विश्लेषणात्मक अशी माहिती सादर करायची आहे. तर आता निबंधाच्या मूळ विषयाला सुरूवात करू या -

**विषयगाभा :-**

**उ**परोक्त प्रस्तावनेतून निबंधाच्या विषयातील दोन्ही संकल्पना समजून घेतल्यानंतर आता निबंधाला सुरूवात करणे रास्त ठरेल.

'**वि**कास' या विषयावर लिहिण्यासाठी तुलनात्मक विचार मांडणे गरजेचे आहे, भूतकाळात डोकावणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण पहिला मुद्दा विचारात घेऊ.

१. **वेदकाळातील महिला** :-

**या** काळाची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतली तर असे लक्षात येते की भारतात वेदकाळी महिलांना मान होता. त्यांना मुलांच्या बरोबरीने आवश्यक असे शिक्षण मिळत असे व उपनयनाचा अधिकार होता. उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनास सुरूवात होई. ब्रम्हवादिनी व सद्योव्दाहा असे विद्यार्थीनींचे दोन प्रकार होते. ब्रम्हवादिनी मुली आजन्म ब्रम्हचर्य पाळून वेदविद्येचा व ब्रम्हविद्येचा अभ्यास करीत. पठणाशिवाय स्वतंत्र लेखनही त्या करीत.

**लो**पामुद्रा, विश्ववारा, घोषा, या विदुर्षींनी रचलेल्या ऋच्या ऋग्वेदात आढळतात. ब्रम्हयज्ञाच्या वेळी केल्या जाणाऱ्या तर्पणात सुलभा, गार्गी, मैत्रेयी व वाचक्नवी या विदुषी महिलांचीही नावे आढळतात. याज्ञवल्क्य यांची पत्नी मैत्रेयी आत्मज्ञानविषयक जिज्ञासेबद्दल प्रसिध्द होती. विदेह जनकाच्या राजसभेत जी आध्यात्मिक चर्चा चाले तिच्यात गार्गी प्रमुख होती. तिने एका प्रसंगी याज्ञवल्क्यालाही वादात कुंठीत केले होते. ब्रम्हवादिनी पुरूषांप्रमाणेच अध्यापनाचा व्यवसाय करीत. त्यांना उपाध्याया किंवा आचार्या अशी संज्ञा होती.

**स**द्योव्दाहा विद्यार्थीनी सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घेउन अनुरूप पतीशी विवाहित होत. गृहस्थाला पत्नीवाचून यज्ञाचा अधिकार नसे. यज्ञात पत्नीचा फार महात्वाचा वाटा असे. सामवेदातील ऋचा गाणे, यज्ञीय तांदूळ कुटणे, यज्ञीय पशुंना स्नान घालणे, यज्ञवेदीच्या वीटा रचणे इ. कामे तिलाच करावी लागत. सीतायज्ञ, रूद्रबल, रूद्रयाग यासारखे यज्ञ फक्त महिलांनीच करावयाचे असत याचा अर्थ स्त्रीशिवाय गृहस्थाला गृहस्थपणच येत नसे. किती सन्मानाची वागणूक दिली जात असे वेदकाळातील महिलांना !

**स्व**तंत्र व सुबुध्द महिला आपल्या अपत्यांच्या सर्वश्रेष्ठ गुरू समजल्या जात हजार शिक्षकांपेक्षा पिता श्रेष्ठ गुरू व पित्यापेक्षा हजार पटींनी माता श्रेष्ठ गुरू समजावी, अशा अर्थाचे एक सुभाषित प्रसिध्द आहे. वैदिक काळात सुरू झालेली स्त्री शिक्षणाची उच्च परंपरा त्यानंतरच्या रामायण महाभारत काळात टिकून होती. तसेच बौध्द - जैन धर्माच्या प्रारंभीच्या काळात सुध्दा स्त्रियांना शिक्षणाच्या क्षेत्रात मानाचे स्थान होते. सूत्रकालापर्यंत स्त्रियांची ही

स्थिती होती. मात्र.......... त्यानंतर त्यांचा सामाजिक दर्जा खालावला आणि पुरूषवर्गाला जास्त महत्व प्राप्त झाले आणि इथूनच मध्ययुगातील स्त्रियांची पिछेहाट सुरू झाली.

**२. मध्ययुगातील महिला** :-

**म**ध्ययुगात स्त्रियांची स्थिती अतिशय चिंताजनक झाली होती. शिक्षणाची व्दारे बंद होती.

'बंदिवान मी जन्मीची नारी बनूनी जन्म भूवरी' हा मध्ययुगीन भूतकाळ असला तरी सत्यकाळ होता. 'चूल आणि मूल' एवढेच चाकोरीबध्द जीवन ती जगत होती. विवाहाचे वय जेमतेम आठ-नऊ वर्षे ! विधवा विवाहास परवानगी नव्हती एवढेच काय पण नवरा मेल्याचे खापर पूर्णपणे तिच्याच माथ्यावर फोडले जाऊन तिचा अनन्वित छळ केला जात असे. पण त्यापूर्वी तर पती निधनानंतर या छोट्या छोट्या बालिकांना पतीच्या चितेवर जाळले जात असे म्हणजेच 'सतीची चाल' अस्तित्वात होती.

**या**च काळात महिला कौटुंबिक आणि सामाजिक बंधनात जखडल्या जात, पुरूषी वर्चस्वाखली भरडल्या जात. महिलांची मुस्कटदाबी सर्रास सुरू होती. कित्येक वर्षे हालअपेष्टा सहन केल्यानंतर आधुनिक काळात म्हणजे सन १८१८ पासून इंग्रजांमुळे भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारचे बदल झाले. लोकहितवादी आणि आधुनिक भारताचे जनक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या राजा राममोहन रॉय यांनी धर्मसुधारणा, समाजसुधारणा, स्त्रीसुधारणेचा श्रीगणेशा प्रथमतः बंगाल प्रांतात सुरू केला. त्यांनी स्थापन केलेल्या ब्राम्हो समाजामुळेच स्त्री - उन्नती व सुधारणा चळवळीचा पाया घातला गेला. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महार्षी धोंडो केशव कर्वे आदी समाजसुधारकांनी संस्कृतीतील वाईट चालीरीती मोडीत काढल्या. धर्मपंडितांच्या आदेशानुसार कोणत्याही धर्माप्रती कार्य करण्याची स्त्रियांना बंदी होती. हा अधिकार महिलांना मिळवून देण्यात पंडिता रमाबाई, अहिल्याबाई होळकर, रमाबाई महादेव रानडे यांनी महिलांचा उध्दार करण्याचे व्रतच घेतले होते. या व्रताची फलप्राप्ती म्हणजेच हळूहळू समाजात महिलांचा होणारा विकास !

**१८८०** ते १९३० या काळात भारतात महिला आंदोलनाला यश आले. राष्ट्रीय विकासात महिलांना स्थान मिळाले म्हणून भारत छोडो, सविनय कायदेभंग, स्वदेशी अभियान,

असहकार आंदोलन अशा अनेक चळवळींमध्ये महिला अग्रेसर राहिल्यात. महिलांचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी डॉ. मुथ्थुलक्ष्मी रेड्डी, डॉ. ॲनी बेझंट, लेडी टाटा, मार्गारिट काझिन अशा अनेक कर्त्या महिलांनी महिला विकासासाठी तर सरोजिनी नायडू यांनी मानवाधिकारासाठी प्रयत्ने केले, संघर्ष केला. महिला म्हणजे केवळ महिला नाहीत तर ते एक चालते-बोलते महान शक्तीपीठ आहे, याची समाजाला जाणीव करून दिली. सहकार्य हाच प्रगती करण्याचा आणि पुढे जाण्याचा एकमेव मार्ग आहे हे ओळखून मानवाधिकारासाठी केलेल्या शर्थीच्या प्रयत्नांना यश आले. परिणामतः १९३७ च्या निवडणुकीत ४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या गेल्या. स्वातंत्र्यपूर्व काळातील हा महिलांचा विकास म्हणजे तिच्यातील कर्तव्य, कर्तृत्व आणि प्रभुत्व या गुणांची ग्वाही देणारा होता.

**स्वा**तंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक क्षेत्रात काम करण्यास महिला सक्षम आहेत हे सिध्द झाले. कारण स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात पुरूषांच्या बरोबरीने पुरूषार्थासारखाच महिलार्थ गाजवला व स्वतःच स्वतःला समाजात एक नवा दर्जा प्राप्त करून घेण्याचे समाधान अनुभवले. याच कारणास्तव महिलांनी राजकारणातील प्रवेश, परदेशी मालावर बहिष्कार, असहकार आंदोलनात मोठा सहभाग घेतला. वेळप्रसंगी तुरूंगवासही पत्करला. आधुनिक काळात मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रिया विविध क्षेत्रात काम करू लागल्या. इथूनच महिलांच्या विकासाला आरंभ झाला. महिलांच्या आयुष्यातील काळाकुट्ट अंधार हळूहळू दूर होऊ लागला. वारसा हक्क कायदा १९५६, बहुपत्नीत्वाची चाल बंद झाली. विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्याचा हक्क प्राप्त झाला. हुंडाबंदी तसेच वेश्या व्यवसाय, बलात्कार विरोधी कायदा असे अनेक कायदे आल्यामुळे महिलांचे जीवन सुलभ झाले. विकासाच्या मार्गातील हा टप्पा म्हणजे महिलांच्या आयुष्यातील पहिला मैलाचा दगड ठरला. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी तिच जगाते उध्दारी' ही म्हण प्रत्यक्षात आणण्याचा तिने विडाच उचलला जणू !

**विकासाचा पुढचा टप्पा :-**

**जि**द्द, चिकाटी आणि ध्येय गाठण्यासाठीचे अंगी असलेले सामर्थ्य या त्रिगुणाचा आविष्कार म्हणजे स्त्री !, अशी स्त्रीची केलेली व्याख्या तंतोतंत खरी आहे याचमुळे

स्वातंत्र्य,समता आणि समृध्दीच्या पक्षपाताविरूध्द स्त्रियांनी प्राचीन काळापासून केलेल्या युध्दाला विसाव्या शतकात यश आले. खरे पाहता, सृष्टी निर्मितीच्या चक्रातील नर-मादी हे प्रमुख घटक ! दोन्हीही समान दर्जाचे ! मग यांच्यात वर्चस्वासाठी संघर्ष का व्हावा, हाच खरा चिंतनशील विषय ठरतो. तराजूच्या दोन तागड्यामधील श्रेष्ठ कोण ? असा हास्यास्पद प्रश्न निर्माण करण्यातलाच हा एक प्रकार खेद निर्माण करणारा आहे. परंतु, संकटांना आव्हान देत, 'ये', मी लढण्यास सज्ज आहे आणि माझा विजय निश्चित आहे, अशा दमदार आणि आक्रमक भूमिकेत आज महिला सरसावल्या आहेत. ही महिलांची विकसित भूमिका नाही का ?

**या**चाच परिणाम म्हणून २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्युयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला. त्याच्या पुढच्याच वर्षी १९१० च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेनुसार ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला मात्र हे महत्वा भारताला कळायला तब्बल ३३ वर्षे लागलीत. चांगली फळे मिळण्यासाठी अधिक काळ वाट पहावी लागते, या न्यायाप्रमाणे मुंबईत पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ ला साजरा केला गेला तर पुण्यात ८ मार्च १९७१ म्हणजे मुंबईनंतर तमाम ३२ वर्षांनी मोठा मोर्चा काढण्यात आला. कोणत्याही वाहनाचा सुरूवातीचा वेग हा संथ असतो, त्याप्रमाणे महिला विकासाची ही गाडी हळूहळू पुढे सरकत होती. पुण्यात काढलेला मोर्चा ही भारतातील महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीची सुरूवात होती. त्यानंतर स्त्रीवादाची ३ स्थित्यंतरे झाली आता ती ४ थ्या स्थित्यंतराकडे वळते आहे. ही समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका सांगणारी मालिका आहे. ही तीन स्थित्यंतरे कोणती, हे आपण थोडक्यात जाणून घेऊ. तरच महिलांच्या विकासाचा आलेख कसा कसा वर चढत गेला, हे चित्र स्पष्ट होईल.

**<u>पहिले स्थित्यंतर</u> :-**

**या**त काही पुरोगामी पुरूषांच्या पुढाकारामुळे महत्वाचे बदल घडून आले. यामध्ये सतीबंदी (१८२९), विधवा पुर्नविवाह कायदेशीर मान्यता (१८५६), स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध (१८७०), आंतर जमातीय विवाहास मान्यता (१८७२) संमतीवयामध्ये वाढ (१८९१) यांचा समावेश होतो.

**दुसरे स्थित्यंतर** :-

**या**त भारत महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन (WIA), National Council of Women for India, All India women's Conference (AIWC) या संघटनांचा उदय होतो. या संघटित चळवळींव्दारे प्रांतामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार (१९२१), बालविवाह प्रतिबंधित कायदा (१९२९), स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मालमत्तेचा हक्क यासारखे महत्वपूर्ण बदल झाले.

**तिसरे स्थित्यंतर** :-

१९४७ ते १९७० च्या स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रबांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले. अर्थात् संविधानात अंतर्भूत मूलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्वे यामध्ये स्त्रियांचे हक्क व अधिकार यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला पण या तरतुदीच्या अंमलबजावणीतील अपयशामुळे १९७० च्या दशकात स्त्री चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक नविन टप्पा सुरू झाला. या टप्प्यामध्ये असमान वेतन, स्त्रियांचे अकुशल कामगारात वर्गीकरण, विनामोबदला श्रम, सामाजिक संस्थांमधील (जात,धर्म, वर्ग, कुटुंब इत्यादी ) सत्तेच्या संरचनेतील पुरूषी वर्चस्व या समस्यांवर भर होता.

**चौथे स्थित्यंतर** :-

**स्वा**तंत्र्योत्तर कालखंडातील २१ व्या शतकातील टप्प्यांमध्ये स्त्री चळवळ स्त्री पुरूष समानतेच्या पलीकडे जाऊन स्त्रियांची वैयक्तिक जीवन ठरविण्याची सत्ता व त्यांचे सक्षमीकरण यासारख्या मुद्द्यांवर प्रकाश टाकणारे आहे.

**व**रीलप्रमाणे महिलांचा पूर्वेतिहास, त्यानंतर त्यांच्यात क्रमा-क्रमाने होणारा विकास यावर आपण थोडीफार चर्चा केली. पण प्रत्येक गोष्ट घडण्यास काही कारण असावी लागतात, कारणीभूत परिस्थिती असते, तर काही जळजळीत वास्तव असते. हीच महिलांच्या विकासाची कारणमिमांसा आपण यापुढे थोडक्यात जाणून घेणार आहोत. त्यामागे कोणती कारकतत्वे आहेत, त्याबद्दल अवलोकन केल्यानंतरच महिलांचा विकास कां झाला हे लक्षात येते.

## महिलांच्या विकासाची कारणमिमांसा :-

### १. स्त्री शिक्षण :-

महिलांपुढे गंभीर समस्या होत्या आणि आजही आहेत, मान्य आहे परंतु 'शिक्षण' या जादूच्या कांडीने सोडविली जाणार नाही अशी एकही समस्या नाही. ही जाणीव आपल्याला ब्रिटिशांच्या काळातच झाली या दृष्टिने एकोणिसाव्या शतकातला स्त्री पुरूष शिक्षणाचा इतिहास अत्यंत रोमांचकारी आहे. ब्रिटिशांनी आपल्यावर दीडशे वर्षे राज्य केलं. त्याचे अनेक चांगले वाईट दूरगामी परिणाम झालेत. ब्रिटिश सरकारनं त्यांच्या गरजेनुसार भारतीयांना शिक्षण दयायला सुरूवात केली. या इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने इथल्या विचारवंतांमध्ये मंथन सुरू झाले आणि सामाजिक सुधारणा त्यांना महत्वाच्या वाटू लागल्या. शिक्षण, स्त्री-शिक्षण हा त्यातला एक महत्वाचा घटक होता. समाजासाठी शिक्षण ही मूलभूत परिवर्तनाची नांदी ठरेल हे लक्षात घेऊन महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी कौटुंबिक, सामाजिक पातळीवरचा विरोध पत्करून सावित्रीबाईंना शिकविले. १८४८ मध्ये त्यांनी पुण्यात शाळा काढली. १८५१ मध्ये त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली समाजाने केलेली हेटाळणी सोसून सावित्रीबाईंमधली आद्यशिक्षिका घडली.

महात्मा फुले यांनी सुरू केलेली ही परिवर्तनाची चळवळ सावित्रीबाईंनी सुरू ठेवली. नवऱ्याच्या आग्रहामुळे विवाहनंतर, शिकलेल्या आणि नंतर शिक्षण क्षेत्रात जीवापाड काम केलेल्या स्त्रियांमध्ये सावित्रीबाईंसोबतच रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक यांचीही नावे ठळकपणे जोडली जातात.

खरेतर याही आधी १८२४ मध्ये मुंबईत गंगाबाई नावाच्या महिलेनं मुलींची शाळा काढली होती, असा उल्लेख अरूणा ढेरे यांच्या 'विस्मृतीचित्रे' या ग्रंथात सापडतो. परंतु त्यानंतर गंगाबाई दोनच महिन्यात मृत्युमुखी पडल्या त्यामुळे ही शाळा बंद पडली १८८५ मध्ये कोलकत्यात स्वरूपकुमारी देवी यांनी शक्ती समिती, १८९२ मध्ये पं. रमाबाई यांनी शारदा सदन, १९०९ मध्ये रमाबाई रानडे यांनी मुंबईत सेवासदन या शिक्षणसंस्थांची स्थापना केली. काशीबाई हेर्लेकर, डॉ. काशीबाई नवरंगे यांचीही या कामात साथ मिळाली.

१९२३ ते १९७३ या अर्धशतकात ताराबाई मोडक यांनी भारतभर बालशिक्षणाच बीज रोवलं आणि बालशिक्षणाच्या क्षेत्रात उचित तंत्र निर्माण केल. १९२४ मध्ये नागपूरच्या जाईबाई चौधरी यांनी चोखामेळा कन्याशाळेची स्थापना केली, तर अंजनाबाई देशभ्रतार यांनी मुलींसाठी वसतिगृह काढलं.

**त्या**चप्रमाणे मुस्लिम मुलींसाठी बेगम जजिरा, आतिया आणि जोहरा फैजी तसेच रूकीया हुसैन यांनी शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान दिले. या काळात उच्चशिक्षित स्त्रिया या समाजसेविका, स्वातंत्र्यसैनिकही होत्या. त्यात सरलादेवी चौधुराणी, हेमप्रभा मुजुमदार, ज्योतिर्मयी गांगुली अशा अनेक जणी होत्या.

१९३७ मध्ये गांधीजींनी नई तालीम ही संकल्पना मांडली, जी गांधीजींच्या शांती आणि अहिंसेच्या तत्वांचा आविष्कार होता असे म्हणता येईल. गांधीजींच्या प्रेरणेने सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, मुत्थुलक्ष्मी रेड्डी या महिलांनीही शिक्षण आणि स्वातंत्र्यलढ्यात भरगच्च काम केलं. त्याचप्रमाणे अबला बोस, सरलादेवी राय, मृणालिनी सेन यांनी शिक्षणसंस्था स्थापण्यात पुढाकार घेतला. साधारणपणे १९०१ ते १९५० हा अर्धशतकी काळ शिक्षणाचं महत्व आणि शिक्षणप्रसार या दृष्टीने महत्वाचा काळ होता डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर म्हणतात की महिलांनी केवळ कुटुंबांच्या नव्हे तर स्वतःच्या उन्नतीसाठी शिकले पाहिजे. बाबासाहेबांच्या प्रेरणेने दलितांच्या पिढ्या शिकू लागल्यात त्यात स्त्रियाही होत्या हे महत्वाचे !

**म**हिलांना चहू बाजूने शिक्षण खुलं व्हावं, प्रत्येक विषयाचं शिक्षण घेण्याची संधी त्यांना मिळावी यासाठी समाजसुधारकांना, समाजसेविकांना महिलांसाठी शिक्षणाचा श्रीगणेशा करताना किती झगडावं लागलं, अनेक संकटांना तोंड द्यावं लागलं, हे आपण वरील 'स्त्री'-शिक्षण या मुद्द्यातून जाणून घेतलय. आता प्रश्न असा उपस्थित होतो की खरच शिक्षणामुळे महिलांचा विकास झाला का ? किंवा त्यांचा कौटुंबिक, सामाजिक दर्जा उंचावला का ? याचे उत्तर नक्की होकारार्थी असणार आहे ते कसे यावर आता आपण थोडा प्रकाश टाकू -

## २. स्त्री शिक्षणाचे फायदे :-

**म**हिला ही कुटुंबाचा केंद्रबिंदू असते. तिच कुटुंबाचा आस असते. संबंध कुटुंबच तिच्याभोवती फिरत असते. जर कुटुंबाचा हा केंद्रबिंदू ठाम नसेल, निश्चयी नसेल, शिक्षित नसेल तर काय होईल ? तर त्या कुटुंबाला स्थैर्य प्राप्त होणार नाही संपूर्ण कुटुंबाची फरफट होईल. देशाची, समाजाची अधोगती होईल. हे वाईट परिणाम टाळायचे असतील तर महिलांना साक्षर होणं, शिक्षित होणं अत्यंत गरजेचं आहे नव्हे तर ती आजच्या बदलत्या काळाची गरज आहे, त्रिकालाबाधित सत्य आहे.

**शि**क्षणामुळे महिला साक्षर आणि सूज्ञ झाल्यात. पूर्वीच्या काळापासून जो एक पायंडा रोवला गेला होता की, महिलांनी घर सांभाळावे आणि पुरूषांनी बाहेरील काम करून आर्थिक दृष्ट्या घर चालवावे. हा अपसमज स्त्रियांच्या शिक्षण चळवळीमुळे मोडीत निघाला. महिलांच्या शिक्षित असण्याने त्यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळू लागली. समाजातील घडामोडी कळू लागल्या. एक शिक्षित महिला आपले कुटुंब सहजपणे सांभाळू शकते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला जबाबदार बनवू शकते. मुलांमध्ये चांगले गुण वाढवू शकते. सामाजिक कार्यात सहभागी होऊ शकते. थोडकयात -

“महिला म्हणजेच निरोगी राष्ट्राचा पाया ।

शिकू द्या तिला आणि होऊ द्या लढवय्या ।।”

शिक्षण म्हणजे काय ? स्त्रिया, महिला शिकल्या पाहिजेत, असे आपण वरच्या पॅराग्राफ मध्ये ठासून सांगितले आहे, त्याचे फायदे पाहिलेत पण शिक्षण म्हणजे नेमके काय ? या प्रश्नाचं उत्तर आपण सविस्तरपणे जाणून घेऊ.

**अ**न्न, वस्त्र, निवारा याबरोबरच आरोग्य आणि शिक्षण या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. “शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकासाचे साधन, व्यक्तिमत्व विकासाची संधी”. तर विचारपूर्वक, जाणीवपूर्वक, डोळसपणे जगण्याची जबाबदारी म्हणजे शिक्षण अशी सुध्दा शिक्षणाची व्याख्या आपल्याला करता येईल. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की शिक्षण हे मानवी जीवनात मग ती स्त्री असो वा पुरूष - परिवर्तनासाठी अत्यंत महत्वाचे साधान आहे. शिक्षणामुळे बौध्दिक उन्नती होते. त्यातून जीवन सुखमय करणारी प्रगती साध्य

होते. स्त्री शिकली तर प्रगती झाली असा आज सगळीकडे ऐकू येणारा नारा सर्वार्थाने खरा आहे. कारण महिलांच्या माध्यमातून घरोघरी बालकांचे शिक्षण, ज्ञान, चारिन्य आणि आचरण यास योग्य प्रकारे वळण दिले जाते बालकांना, उमलत्या पिढीला सुसंस्कारित केले जाते, अशा प्रक्रियेलाच शिक्षण असे संबोधले जाते.

**को**णत्याही राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्राच्या नैसर्गिक साधनसामुग्री वर अवलंबून असतो. तसाच तो त्या देशातील स्त्री-पुरूष साक्षरता प्रमाणावरही अवलंबून असतो. पूर्वी महिलांवर जे अन्याय व्हायचे, अत्याचार व्हायचेत, छळ व्हायचा तो केवळ तिच्या अशिक्षितपणामुळेच ना ? स्वतंत्र भारताचे पहिले प्रंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात "आपण आपल्या महिलांच्या परिस्थितीकडे पाहून आपल्या राष्ट्राची स्थिती सांगू शकतो" एकूणच काय तर आपल्या देशरूपी नावेला प्रगतीपथावर नेणाऱ्या सुकाणुचे काम या महिला करतात, या विधानाबाबत दुमत असू नये असे आत्मविश्वासाने सांगावेसे वाटते. कारण हाच आत्मविश्वास महिलांना शिक्षणामुळेच प्राप्त होतो, हे विशेष ! स्त्री - शिक्षणाची ज्ञानगंगा आज आदिवासी भागातही वाहती झाली आहे. दारिद्र्य निर्मुलनासाठी महिला आणि मुलींचे शिक्षण हे महत्वाचे कनेक्शन आहे, हे अनुभवातून सर्वांनाच पटू लागले आहे. " घे उंच भरारी शिक्षणाची । अभिमानाने मान उंच कर देशाची ।"

**म**हिलांच्या शिक्षणासंबंधी वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की "स्त्री - शिक्षण हा कोणतयाही समाजजीवनाच्या समृध्दीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे"

**स्त्रिशिक्षणामुळे कुटुंबाच्या आरोग्यात सुधारणा :-**

**मु**लीच्या किंवा महिलांच्या शैक्षणिक पातळीत सुधारणा केल्याने तरूण स्त्रियांच्या आरोग्यावर आणि आर्थिक भविष्यावर स्पष्ट प्रभाव पडतो. ज्यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक विकास साधल्या जातो. ज्या बालकांच्या मातांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे त्यांचा बालमृत्युदर, ज्यांच्या माता निरक्षर आहेत त्यांच्या तुलनेत अर्धा आहे. याचाच अर्थ हा की शिक्षणामुळे महिलांची बुध्दी कार्यान्वित झाली. सुप्त शक्ती , क्षमता वाढीस लागली आणि तिला स्वतः जगण्यासाठी व आपल्या अपत्यांना जगविण्यासाठी जणू संजीवनी विद्याच

गवसली. होय, शिक्षण हे संजीवनी विद्येसारखेच आहे. यावरुन सहजच एका छोटयाशा गोष्टीचे स्मरण झाले, ती इथे नमूद करण्याचा मोह आवरत नाही, ती अशी-

नेपोलियनला एकदा विचारले गेले की, फ्रान्सची मोठी गरज काय आहे? तो तडक उत्तर देतो, ''प्रशिक्षित आणि सुशिक्षित आई । आई शिवाय राष्ट्राची प्रगती अशक्य आहे. जर माझ्या देशातील स्त्रिया शिक्षित नाहीत तर निम्म्या लोकांकडे दुर्लक्ष होईल. महिला शिक्षणाबद्दल नेपोलियनचे असे मत होते. आमचे मतही नेपोलियनपेक्षा वेगळे नसावे.

**ग**र्भावस्थेपासून वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत जे संस्कार माता मुलांवर करते ते कोणतीही शाळा, महाविद्यालये करु शकत नाही. हेच संस्कार जीवनभर विकसित होत राहतात. या दृष्टीने महिलांचा शिक्षणातील सहभाग निःसंशय उत्कृष्ट आहे. या ठिकाणी आणखी एक मुद्दा आपल्याला विचार करायला लावणारा आहे. समजा एखादी माता निरक्षर आहे. घरात तिच्याशिवाय केवळ एक अपत्य आहे. अचानक हा मुलगा आजारी झाला तर या माऊलीला अक्षरज्ञान नसल्यामुळे कोणत्याही मेडिसिनचे (घरात असल्या तरीही) नाव वाचता येणार नाही. कोणताही प्राथमिक उपचार करता येणार नाही. वाचता न आल्यामुळे अनेक वेळा भलतेच औषध दिल्या जातात आणि दुर्घटना होतात. आजही अशिक्षित, आदिवासी जमातीत दुर्देवी घटना घडतात. पश्चाताप करण्यापलीकडे हाती काहीच शिल्लक राहत नाही. म्हणून हे मातृ विद्यापीठ, महिला विद्यापीठ शिक्षीत असणे गरजेचे आहे. अशा प्रकारची जीवितहानी टाळायची असेल, कुटुंबाचे संरक्षण करावयाचे असेल तर महिलांचा विकास हा झालाच पाहिजे. आणि विकास होतो तो केवळ शिक्षणामुळे हे आज आम्हाला पूर्णपणे अनुभवाअंती पटलेले आहे. म्हणून म्हणावेसे वाटते-

''विकास महिला शिक्षणाचा । जागर तिच्या आत्मभानाचा ।
आरसा तिच समाजमनाचा । घेऊ या वसा जन जागृतीचा ।।''

**<u>स्त्री शिक्षणामुळे स्वतः महिलांच्या आरोग्यात सुधारणा :-</u>**

**आ**हार, चांगल्या सवयी, योगा आणि वैद्यकीय सल्ला या चतुःसूत्रीवर महिलांचे स्वस्थ आरोग्य अवलंबून आहे याची जागृती आज प्रत्येक महिलेमध्ये निर्माण होत आहे आणि त्यानुसार ती आपल्या आरोग्याकडे लक्ष केंद्रित करण्यास मनापासून तयार होत आहे. हा

महिलांचा मानसिक स्तरावरील विकासच नव्हे कां? याचे मूळ तपासून पाहिले तर या विकासाच्या, प्रगतीच्या मुळाशी केवळ आणि केवळ एकच प्रणाली आणि ती म्हणजे 'शिक्षणप्रणाली'! स्त्रियांचे मानसिक आरोग्य, जननसंस्थेचे आजार व कॅन्सर आणि रजोनिवृत्तीच्या वेळी होणारा त्रास आदीबाबत श्रवण, मनन, वाचन, चिंतन आणि या संदर्भात जागोजागी होत असलेले विविध उपक्रम आणि शिबीरे इत्यादींच्या माध्यमातून महिलांना पुरेसे आणि योग्य ज्ञान मिळू लागले आहे. समाधानाची बाब म्हणजे त्यानुसार महिला स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊन कुटुंबाचे रक्षण करु लागल्या आहेत. विकास वाटेवर महिलांचे हे पाऊल म्हणजेच समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका आहे, असे नाही का वाटत? म्हणूनच असे म्हणतात "मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण!".

**३) महिलांचे सक्षमीकरण :-**

**म**हिलांची समाजात विकसित होत असलेली भूमिका याबद्दल कारणमिमांसा जाणून घेत असताना पुढील मुद्दा आपल्याला सापडतो आणि तो म्हणजे महिलांचे सक्षमीकरण! सक्षमीकरणामुळे महिलांचा विकास होत गेला हे निर्विवाद सत्य आहे. त्यावर सविस्तर लिहिण्यापूर्वी आपण सर्वप्रथम जाणून घेऊ या-महिलांचे सक्षमीकरण म्हणजे काय?

**स**क्षमीकरण म्हणजे अशी प्रक्रिया ज्याद्वारे शोषित व्यक्तिंना स्वतः आयुष्यावर ताबा मिळविता येतो, यामुळे जगण्याच्या ज्या मूलभूत गरजा आहेत, त्या भागविता येतात. या प्रक्रियेत व्यक्तिस शक्ती, युक्ती, सामर्थ्य आणि आत्मविश्वास प्राप्त होतो, तिचा स्वाभिमान वाढतो आणि अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी बळ निर्माण होते. अशाप्रकारे पारंपारिक अर्थाने दुर्बल समजल्या जाणाऱ्या महिलांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करुन त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याच्या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

**आ**ता या महिला सक्षमीकरणासाठी कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्यात ज्यामुळे समाजात महिलांची भूमिका विकसित होत गेली-त्या आपण थोडक्यात पाहू-

**उपाययोजना** :-

अ) **संवैधानिक तरतूदी** :-

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिका, मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. समानतेचा (Equality Gender) हक्क सर्वात महत्वाचा आहे.

**ब) वैधानिक तरतुदी** :-

महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा, यासारखे अनेक कायदे करण्यात आलेतण अलिकडच्या काळात केंद्र सरकारने १९९३ मध्ये केलेल्या राष्ट्रीय महिला आयोग, महिलांचे सक्षमीकरणविषयक राष्ट्रीय धोरण, ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्त्याद्वारा स्थानिक शासनात ३३% टक्के जागा व अधिकारपदे महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत. आता तर हे आरक्षण ५०% झाले आहे.

क) **स्वयंसहायता गटांच्या स्थापनेस प्रोत्साहन** :-

आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या महिलांनी एकत्र यावे आणि स्वयंसहायता गटांची स्थापना करुन आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण व्हावे या कृती कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. अशा उपक्रमांसाठी शासन व वित्तसंस्था अनुदान देतात. सवलतीच्या दरात वित्तपुरवठा करतात आणि त्यांच्याद्वारा उत्पादित वस्तुंच्या विपणनास सहाय्य करतात.

ड) **महिलांना मतदानाचा हक्क** :-

महिलांना विसाव्या शतकापर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. 'मतांचा अर्थ दोन प्रकारचा आहे. प्रचलित पहिला अर्थ म्हणजे राजकीय अर्थ 'मत (Vote) दान' देणे आणि दुसरा अर्थ स्वतःचे वैचारिक मत (Opinion) देणे कोणत्याही बाबतीत स्त्रीयांनी आपले मत, विचार व्यक्त करु नयेत हे बंधनच तिच्या वैचारिक, कौटुंबिक, सामाजीक, राजकीय भूमिकेचे खच्चीकरण होते. पण जमेची बाजू ही की राजकीय अर्थाने मतदान करण्याचा अधिकार भारतीय महिलांना देशाला स्वातंत्र्य मिळालं त्या दिवशीच मिळाला.

**व**रील सर्व अधिकार किंवा महिलांना अनुकूल असे जे कायदे, तरतुदी करण्यात आल्यात, त्या काही आपोआप झाल्या नाहीत. त्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. पण या

कडव्या संघर्षाचे फळ मात्र गोडच मिळाले. प्रदिर्घ काळ 'चूल आणि मूल' यात अडकलेल्या महिलांना राजकारणात सत्तेचा वाटा मिळाला. हीच समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका आहे याचे प्रत्यंतर येते. या ठिकाणी नुकत्याच मिळालेल्या माझ्या माहितीनुसार एक गोष्ट प्रकर्षाने नमूद कराविशी वाटते आणि ती म्हणजे - 'स्त्री शक्ती' या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या ध्येयाला धरुन महिलांच्या विकास व सबलीकरणाचा ध्यास या विद्यापीठाने घेतला असून त्यासाठी जो प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार केला आहे, तो केल्यास नक्कीच महिलांचे नेतृत्व यशस्वी होऊन सर्वांगीण विकास साधण्यासाठी महिलांची भूमिका कणखर राहील. हा सकारात्मक बदल म्हणजे खऱ्या अर्थाने कृतीशील असे महिलांचे सक्षमीकरणच! हीच महिलांच्या विकासाची पावती!!

**या** संदर्भात काही ठळक गोष्टी म्हणजे जर्मनीच्या क्लॅराझेटकीन हीने मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी कठोर संघर्ष केला, तर ब्रिटिश खासदार जॉन स्टुअर्ट मिल ही संसदेमध्ये १८६९ साली महिलांच्या मतदान करण्याच्या अधिकाराची मागणी करणारी पहिली व्यक्ती होती. १९ सप्टेंबर १८९३ ला महिलांना मतदान करण्याचा अधिकार देणारा न्युझिलंड हा पहिला देश आहे.

**आ**तापर्यंत आपण महिलांना स्वतःच्या अधिकारासाठी कसा लढा द्यावा लागला आणि हा लढा कसा यशस्वी ठरला याविषयीची महिलांची संग्रामगाथा जाणून घेतली. ती जाणून घेत असताना 'स्त्री शक्तीचा विजय' झाला ही अत्यंत समाधानाची बाब आपल्या लक्षात आली. आता यापुढचा मुद्दा आपल्याला विचारात घ्यायचा आहे की या विजयानंतर वर्तमानात महिलांचे स्थान कोणते आहे? आजपर्यंत तिने कशी उंच भरारी घेऊन आपले मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

**<u>स्त्री शक्तीचा विजय :-</u>**

**भा**रत जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. या भारतात सत्ता हवी असेल तर महिलांचं म्हणणं ऐकावं लागेल. (प्रगत महिला) हे आता इथल्या राजकारण्यांना जाणवू लागले आहे. याचाच प्रत्यय बिहारमध्ये आलाय. बिहार हे महिला मतदारांची संख्या

अधिक असलेल्या राज्यांपैकी एक आहे. साक्षरतेमुळे हे प्रमाण वाढल्याचे संकेत मिळतात. त्याचे काय झाले पहा-

इथे महिलांनी आपण आपल्या नवऱ्याच्या 'पिण्याच्या' सवयीमुळे त्रासल्याची तक्रार केली. त्यांनी आपलं म्हणणं लावून धरलं आणि एकवटलेल्या स्त्री शक्तीला यश आलं परिणामतः बिहारमध्ये दारुबंदी करण्यात आली. या दारुबंदीचा १० कोटी जनतेवर परिणाम झाला. या दारुबंदीनंतर कौटुबिक हिंसाचार, आत्महत्या, दारुवर पैसे उडवणे या समस्या झपाटयाने कमी झाल्याचा दावा राज्य सरकारने केला आहे. समाजात विकसित होत असलेली महिलांची ही भूमिका आणि कणखर नेतृत्व मान्य करायला लावणारे आहे स्त्री शक्तीचा हा विजय आहे.

**ये**णाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये यापेक्षाही मोठी भूमिका महिला बजावतील असा विश्वास आहे. कारण येथे (बिहार) पुरुषी वर्चस्व असलेल्या रुढीवादी समाजात महिला मोठया प्रमाणावर मतदानासाठी बाहेर पडू लागल्या आहेत आणि गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत महिला आणि पुरुष यांच्या मतदानाच्या टक्केवारीतील फरक खूप कमी झाल्याचं सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट होतय. महिला राजकारण्यांमुळे भ्रष्टाचार कमी होऊन, अधिक विकास होत असल्याचं नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून दिसून आलं आहे. 'स्त्री शक्तीला सलाम!'

विविध क्षेत्रात प्रगतीपथावर आणि वर्तमान काळात अधिकार पद भूषविणाऱ्या महिलांचा आपण आता थोडक्यात परिचय करुन घेऊ.

१) **<u>ज्ञानक्षेत्र</u>** :-

**ज्ञा**नक्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र । शैक्षणिक संस्थांमध्ये मुलींच्या प्रवेशाचा टक्का सतत वाढत आहे. दशकभरापूर्वी झालेल्या सर्वेक्षणानुसार, शैक्षणिक क्षेत्रात महिलांचा सहभाग ५५.१ टक्के होता जो आता वाढून ६८.४ टक्के झाला आहे. म्हणजे या क्षेत्रात महिलांची वाढ १३ टक्क्याहून अधिक नोंदवण्यात आली. विधी क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, अभियंता क्षेत्र, समाजक्षेत्र, या सर्वच क्षेत्रातील ज्ञान जिद्दीने आत्मसात करुन आपल्या ज्ञानाचा वापर

दुसऱ्यांच्या कल्याणासाठी करण्यात अनेक महिला कसोशिने प्रयत्न करीत आहेत. यासाठी खालील महिलांचा निबंधविस्तारच्या भयापोटी अगदी त्रोटक उल्लेख करीत आहे.

अ) सोशल डिझायनर कीर्ती मुळक - रंगीबेरंगी चिंध्यांना धाग्यात गोवून केलेल्या कलाकौशल्याने फॅशन डिझाइनिंगच्या क्षेत्राकडे जाण्याचा तिचा ध्यास पूर्ण झाला.

ब) शैक्षणिक क्षेत्रात वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या अल्पसंख्याक उच्च शिक्षित महिला म्हणजे आबेदा इनामदार-पुणे

क) डॉ. उज्वला बाळासाहेब हरपळे या वैद्यकीय व्यवसायात अग्रेसर आहेत. त्यांनी सुमारे ३५० मोफत आरोग्य शिबिरे घेऊन वाडयावस्त्या आणि पालावरच्या बाळंतिणीसह विविध दिव्यांगाची सेवा केली आणि आजही सुरु आहे.

ड) ॲड. दिप्ती श्रीवत्सन काळे यांनी आपल्या कायद्याच्या ज्ञानाचा वापर करुन महिलांना त्यांचे हक्क मिळवून देणे, त्यांच्यात जागृती निर्माण करणे अशी महत्वाची भूमिका त्या निभावत आहेत.

इ) कोणतीही व्यावसायिक पार्श्वभूमी नसताना पुण्याच्या पूनम कोळंबे यांनी स्पर्धा परीक्षेच्या जगतात अग्रगण्य असलेल्या 'भगीरथ प्रकाशन आणि ॲकॅडमीच्या संचालक पदापर्यंत घोडदौड केली आहे.'

ई) पुण्यनगरीच्या पहिल्या महिला महापौरपदाचा सोनेरी क्षण अनुभवला आहे कमल ज्ञानराव व्यवहारे यांनी.

प) सबलाईम ट्रेंड्स च्या माध्यमातून आऊटलेटस् उभारणीचे व त्याव्दारे किमान पाचश युवक - युवतींना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून देण्याचा ध्यास घेतला आहे मालवणच्या कविता अभंग यांनी !

फ) पर्यावरण जागृतीची चळवळ उभी करणाऱ्या पर्यावरण राक्षिका म्हणजे पुण्याच्या सायली जगताप ! त्यांची ग्रिन स्टेप्स ही संस्था पर्यावरण संवर्धनासंबंधी उपायांवर काम करीत आहे.

यानंतर आपण पुढच्या पुढच्या दालनात प्रवेश करू.

२. सौंदर्यशास्त्र :-

**या** वैचारिक क्षेत्रात मानवी निर्मित कला, ललित कला आणि त्यांचा सौंदर्यानुभव यांचे चिंतन होते. हा सैध्दांतिक पातळीवर खास तत्वज्ञानाचा विषय असून त्याची उत्तम उपाययोजना साहित्यशास्त्रात दिसून येते. मानवी सौंदर्याचे चिंतन म्हणून सौंदर्य प्रांतात सौंदर्याची परिमाणे आणि प्रमाणे स्त्री केंद्रीच आहेंत.

१. ''सौंदर्यशास्त्राच्या दुनियेत'' हे सौंदर्यशास्त्रावर उपयुक्त आणि माहितीपूर्ण पुस्तक लिहिलं आहे अमेरिकेतील विद्यापीठात भौतिकशास्त्रात मिळालेल्या एम.एस. पदवीधर डॉ. वर्षा जोशी यांनी !

२. तेजोमय बी. प्रभा - आरंभीचे कलाशिक्षण नागपूरला आणि पुढील शिक्षण चित्रकारांची पंढरी समजली जाणाऱ्या मुंबईच्या सर जे जे स्कूल ऑफ आर्ट मध्ये ! याच अवधित जलरंगात 'भारतीय स्त्रिया' या विषयावर एक लहानशी चित्रमालिका तयार केली. त्याचवेळी त्यांनी आपले पहिले चित्रप्रदर्शन भरविले अभिमानाची गोष्ट म्हणजे यातील तीन पेंटीग्ज डॉ. भाभा यांनी आपल्या कलासंग्रहासाठी विकत घेतली विशेष म्हणजे त्या काळात भारतात स्त्री कलाकार अभावानेच होत्या.

३. **धर्म आणि स्त्री** : हा अतिशय व्यापक विषय आहे. आधुनिक काळात लोकशाही आणि शिक्षणामुळे महिला 'स्त्री- पुरोहीत' पदापर्यंत जाऊन पोहचल्यात ही समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिकाच नाही का ? केवळ खंत या एकाच गोष्टीची वाटते की स्त्री - पुरोहित फक्त हिंदू आणि काही प्रमाणात बौध्द धर्मात आढळतात. पण जैन, शीख, इस्लाम, खिस्ती धर्मात स्त्री पुरोहित नाही पण याबाबतही नजीकच्याच काळात सकारात्मक पाऊले पडतील ही खात्री आहे.

अ) दिल्ली येथील शीला अत्ता नामक स्त्री पुरोहित ने अभिनेत्री दिया मिर्जा यांच्या मैत्रिणीच्या लग्नातील व या अभिनेत्रीच्या लग्नाचे पौरोहित्य कुशलपणे पार पाडले.

ब) बंगाल मधील खरका येथिल शिक्षिका समर्पिता बोस यांचे विवाह कार्य महिला पुरोहित डॉ. नंदिनी भौतिक, रूमा रॉय आणि त्यांची चमू यांच्या व्दारे संपन्न झाले. आजही त्यांना लग्न, मुंज, गृहप्रवेश, चंडी यज्ञ यासाठी आवर्जून बोलाविले जोते.

म्हैसुर येथील पी. भ्रमरंभा महेश्वरी यांना पूर्वी केवळ कन्नड भाषेचे ज्ञान होते. पण ३५ वर्षांपूर्वी त्यांनी इंग्रज, हिंदी तर आत्मसात केलीच. पण संस्कृतमधील चार वेद, दर्शनशास्त्र आणि उपनिषदांचा सखोल अभ्यास करून पुरोहितपद प्राप्त करून घेतले.

४. **नौदल क्षेत्र** :

अलीकडेच 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार करण्यात आलेल्या तारिणी नौकेवर स्वार होऊन ६ महिला अधिकाऱ्यांनी साहसी मोहीम राबवली. तो दिवस १९ सप्टें २०१७ हा होता. ऐश्वर्या, एस. विजया, वर्तिका जोशी, प्रतिभा जामवाल, पी स्वाती, पायल गुप्ता या त्या सहा महिला अधिकारी होत्या. या मोहिमेला सुमारे २५४ दिवस लागले. मोहीम फत्ते करून या सहा नौदल महिला अधिकाऱ्यांनी इतिहासाच्या पानात आपले नाव नोंदवले आणि आपल्या निबंधाच्या विषयाला एक नवा आयाम दिला.

५. **कृषी क्षेत्र** :-

अन्न व कृषी महामंडळाच्या आकडे वारीनुसार महिलांचे शेतीमध्ये ३२ टक्के तर कृषीविषयक रोजगारामध्ये ४८ टक्के योगदान आहे. देशातील ६० ते ८० टक्के धान्य महिला शेतकरी पिकवतात, तर ग्रामीण भागात ८५ टक्के महिला शेतीत काम करतात. शेतकरी, मजूर आणि उद्योजिका म्हणून महिला शेती व्यवसायात भरारी घेत आहेत.

अ) पालघर जिल्ह्यातील जव्हार या आदिवासी भागातील महिलांच्या विकासासाठी काम करणाऱ्या समाजसेविका आणि शेतकरी महिला म्हणून मीराबाई परशुराम महाले यांची ओळख आहे. ९ ऑगस्ट २०१९ मध्ये प्रगतीशील आदिवासी महिला शेतकरी पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

ब) तामिळनाडू राज्याच्या महिला शेतकरी पप्पा मल यांना जैविक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जैविक उत्पादन निर्माण करण्यासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

क) शेती क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन १९९५ पासून राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत कृषीभूषण पुरस्काराच्या धर्तीवर फक्त महिलांसाठीच जिजामाता कृषीभूषण पुरस्काराची सुरूवात केली आहे. राज्यातून दरवर्षी ५ महिला शेतकऱ्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते 'समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका' या निबंधाच्या

विषयाला अनुसरून अभिमानाने सांगावेसे वाटते की सन २०१३ अखेरपर्यंत ९० महिलांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

६. **क्रिडा क्षेत्र** :-

**या** अंतर्गत आपण खेळातील स्त्रीशक्तीचा विचार करू, पण अगदी थोडक्यात

अ) परभणी जिल्ह्यातील पिंपळगाव ठोंबरे येथील शेतकरी महिला ज्योती गवते हिने ३५ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅराथॉन तीन वेळेस जिंकली. अलाहाबाद मॅरॉथॉन २०१३ ते २०१८ अशी सलग सहा वर्षे तर हैद्राबाद मॅराथॉन तीन वेळेस जिंकली आहे.

ब) अर्जुन पुरस्कार विजेती व सावरपाडा एक्सप्रेस या नावाने प्रसिध्द असलेली धवपटू कविता राऊतने राष्ट्रकुल क्रीडा व आशियाई स्पर्धेत रौप्यपदक मिळवून देशाची मान उंचावली आहे.

क) भारतीय महिला खो खो ची कर्णधार उस्मानाबाद येथील सारिका काळे! आशियाई स्पर्धेत तिने भारताला सुवर्णपक मिळवून देताना 'सर्वोत्कृष्ट खेळाडूचा' बहुमान मिळविला ती सध्या महाराष्ट्र राज्य शासनाच्या जिल्हा क्रीडा अधिकारी या पदावर कार्यरत आहे.

ड) सांगली जिल्ह्यातील स्मृती मंधाना यंदा पुढील महिन्यात होणाऱ्या न्युझिलंड क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सलामीची फालंदाज म्हणून सहभागी होणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने तिचा उत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरव केला आहे.

इ) २०१८ मध्ये इंडोनेशिया येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत कोल्हापूरच्या राही सरनोबत यांनी महिलांच्या २५ मीटर एअर पिस्तुलमध्ये सुवर्णपदक मिळवून इतिहास घडविला अशी कामगिरी करणारी ती पहिलीच महिला ठरली.

**या** शिवाय झुलन गोस्वामी (क्रिकेट), मनिका बत्रा (टेबल टेनिस), राणी रामपाल (हॉकी), विनेश फोगट (पहिली महिला कुस्तीपटू), द्युतीचंद (ॲथलेटीक्स) लवलिना बोरगोहेन (मुष्टियुध्द), अदिती अशोक (गोल्फ), अनिता देवी (लॅड ॲडव्हेंचर), पी.व्ही. सिंधू, साईना नेहवाल (बॅडमिंटन), दीपा कर्माकर (जिम्नॅस्टिक), अन्नू राणी (भालाफेक) अशा कितीतरी महिलांनी क्रीडा क्षेत्र गाजविले आहे आणि पुढेही असेच सुरू राहणार.

७. **राजकारण क्षेत्र** :-

**भा**रतीय राजकारणात महिलांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. भारताच्या पहिल्या महिला प्रंतप्रधान इंदिरा गांधी, सोनिया गांधी, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती, प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शीला दिक्षीत, माजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज, राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे, डाव्या पक्षातील प्रभावी नेत्या वृंदा करात, विविध मंत्रीपद भूषविणाऱ्या अंबिका सोनी, लोकसभेच्या माजी अध्यक्षपदी असणाऱ्या सुमित्र महाजन, आत्ताच्या राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्यासारख्या अनेक यशस्वी महिला राजकारण्यांचा या यादीत समावेश करता येईल. एक विशेष बाब या संदर्भात इथे नोंदवावीशी वाटते, ती म्हणजे २०२५ च्या निवडणुकीपूर्वी अंतिम अर्थसंकल्प सादर करताना आपल्या १० मिनिटाच्या भाषणात भारताच्या अर्थमंत्री मा. निर्मला सितारामन म्हणाल्या, ''सरकार नारी शक्तीचे (महिला शक्ती) महत्व आमच्या उज्वल भविष्याचे आश्रयदाता म्हणून ओळखते''

८ **विज्ञान क्षेत्र** :-

**ज्या** महिलांनी विज्ञान क्षेत्रात आपला आणि आपल्या देशाचा विकास साधण्यासाठी पुरूषांच्या खांद्याला खांदा देऊन आपली अमीट छाप उमटवली त्या महिलांचा अगदी थोडक्यात आढावा घेऊ या.

अ. दर्शन रंगनाथन - या प्रसिध्द भारतीय रसायनशास्त्रज्ञ! त्यांनी युरियाचक्र आणि प्रथिनांच्या संरचनेवर अनेक शोध लावले.

ब. असिमा चॅटर्जी - या विज्ञानात डॉक्टरेट मिळविणाऱ्या पहिल्या महिला! मलेरियाविरोधी औषधांवर त्यांनी बरेच संशोधन केले.

क. जानकी अम्माल :- यांना वनस्पतीशास्त्रात डॉक्टरेट पदवी मिळविणारी पहिली महिला म्हणून ओळखले जाते. संकरित प्रजातींचा शोध आणि उसाच्या संकरित प्रजननावरील त्यांचे संशोधन जगभर गाजले.

ड. अण्णा मणी : या प्रसिध्द हवामान शास्त्रज्ञ म्हणून गाजल्या त्यांनी सौर किरणोत्सर्ग, ओझोन थर आणि पवन उर्जा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले.

इ. रमन परिमाला :- गणित क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल १९८७ मध्ये शांतीस्वरूप भटनागर पुरस्काराने आणि २००३ मध्ये श्रीनिवास रामानुजन जन्मशताब्दी पुरस्काराने यांना सन्मानित करण्यात आले.

**या** शिवाय माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील , सानिया मिर्झा , सुनिता विल्यमूस, कल्पना चावला, राहीबाई पोफरे, मंगेशकर भगिनी, सुधा मूर्ती या सर्वांनी मदर टेरेसा प्रगतीची दारे खुली करून समाजात महिलांची विकसित होत असलेली भूमिका स्वकर्तृत्वाने जगाला पटवून दिली.

**समारोप :-**

**उ**परोक्त वर्णनानुसार निबंधाच्या विषयावर आपण एक एक मुद्दा विचारात घेऊन त्यावर विश्लेषणात्मक आणि संशोधनात्मक चर्चा केली. त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की आज बदलत्या भारतात महिलांची भूमिका सतत विस्तारत आहे. आज देश ''सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास'' या मंत्रानुसार कार्य करीत आहे. जेव्हा सर्व शक्यता सर्वांसाठी समान रुपात खुल्या असतील तेव्हाच सर्वांच्या विकासाचे हे उद्दिष्ट देश साध्य करु शकेल. तेथे स्त्री पुरुष हा भेदभाव असायलाच नको. शतकानुशतके भारताचे बलस्थान हे छोटे स्थानिक उद्योग आहेत आणि या उद्योगात पुरुषांची जितकी भूमिका महत्वाची आहे, तितकीच महिलांचीही आहे, हे जाणकारांनी जाणले आहे.

**नु**कत्याच नागपूरला झालेल्या १०८ व्या 'भारतीय विज्ञान काँग्रेसच्या' उद्घाटनप्रसंगी व्हर्च्युअलरित्या संबोधित करताना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले-''विज्ञान हे मानवतेच्या कल्याणासाठी असायला हवे. ते संशोधकांच्या लॅबमधून निघून लँडपर्यंत (जमिनीपर्यंत) पोहोचायला हवे. नवनविन वैज्ञानिक पर्यायांचा शोध घ्यायला हवा. सर्वात महत्वाचे म्हणजे विज्ञानाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व्हावे; एवढेच नव्हे तर महिलांच्या सहभागातून विज्ञानाचे सक्षमीकरण व्हायला हवे''. असे झाले तर ............ तर उद्याची स्त्री ही

नक्कीच हयापेक्षाही खूपच सामर्थ्यवान असेल, त्यामुळेच उद्याच्या महिलेचं रुप काहीसं नवखं पहायला मिळेल ही खात्री वाटते. आणि तिच पूर्णार्थाने समाजात विकसित होत असलेली महिलांची भूमिका ठरेल !! नेतृत्व ठरेल.

सरतेशेवटी आतापर्यंत पाहिलेली महिलांच्या नेतृत्वाखाली महिलांची कर्तृत्वगाथा काव्यबद्ध करताना असे म्हणावेसे वाटते -

''शास्त्रज्ञ, डॉक्टर बनलीस तू । राष्ट्रपती, प्रधानमंत्री-पद भूषविलेस तू ।।
वित्त, न्याय, लष्करात तू । सोडिले ना एकही असे क्षेत्र तू ।।
अंतराळ पार केलेस तू । चालक, वाहक, सुरक्षारक्षक पदी तू ।।
काय होतीस तू । काय झालीस तू ...........।।

**।। नारी शक्तीला सलाम् ।।**

## संदर्भ ग्रंथ सूची


१) आधुनिक युगातील स्त्रिया - स्वामी रंगनाथानंद

२) भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास - डॉ. अनिल कठारे

३) Women and human rights-Dr. V. Y. Sonawane

४) महिला सबलीकरण - प्राचार्य डॉ. संभाजी देसाई

५) स्त्रीवादी साहित्याचा इतिहास - डॉ. सोनल भामरे

६) शोध स्त्री प्रतिमांचा - आशुतोष पाटील.

७) भारतीय समाज मे महिलाएं - नीरा देसाई एवं उषा ठक्कर